असा. क्र. ३१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जून ४, २००८/ज्येष्ठ १४, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| **सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**— महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . . | **पृष्ठे** २७०-२७२ |

## वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ जून २००८.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2008.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT.

**सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४.**

**महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** मी, श्री. एस. सी. जमीर, महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची कार्ये पार पाडत असून यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मी, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री पटली आहे ;

१९५६ चा मुंबई ४६.



[किंमत : रुपये १५-००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ याच्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र आकस्मिकता निधी (सुधारणा) अध्यादेश, २००८ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम २ ची तात्पुरती सुधारणा.

**२.** या अध्यादेशाच्या अंमलबजावणीच्या कालावधीमध्ये, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम हा, जणू काही त्यातील कलम २ मध्ये " रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा " या मजकुराऐवजी, " रुपये तीनशे पन्नास कोटी इतक्या रक्कमेचा " हा मजकूर दाखल करण्यात आला आहे, असे समजून अंमलात येईल. १९५६ चा मुंबई ४६.

## निवेदन

महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६ (१९५६ चा मुंबई ४६) या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या व ठेवण्यात आलेल्या राज्याच्या आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा रुपये एकशे पन्नास कोटी एवढी आहे.

२. कांद्याच्या उतरत्या किंमती लक्षात घेऊन शासनाने कांदा उत्पादकांना अर्थसहाय्य पुरविण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे ऊसाचे भरघोस उत्पादन झाल्यामुळे, साखर कारखान्यांसाठी विवक्षित प्रोत्साहनपर रकमांची तरतूद करावयाची आहे आणि ज्या शेतकऱ्यांच्या ऊसाचे गाळप न होण्याची शक्यता आहे अशा शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी तरतूद करावयाची आहे. चलनवाढीला आळा घालण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेअन्वये तांदूळ आणि कडधान्ये व डाळी यांचे वितरण करण्याकरिता त्यांची खुल्याबाजारामधून खरेदी करणे आवश्यक आहे. या बाबींसाठी आणि इतर प्रशासनिक खर्च उद्‌भवल्यास, त्यासाठी आकस्मिकता निधीमध्ये विवक्षित रक्कम असणे आवश्यक आहे. मागील दोन वर्षांमध्ये, मुंबई आणि महाराष्ट्र राज्याने अनुभवलेल्या प्रचंड पावसाच्या तडाख्याचा विचार करता, यावर्षी देखील सावधगिरीचे उपाय करणे आवश्यक आहे. नैसर्गिक आपत्ती उद्‌भवल्यास, तातडीचे सहाय्य देण्यासाठी, आकस्मिक निधीमध्ये विवक्षित रक्कम उपलब्ध असणे आवश्यक आहे. खर्चाच्या या बाबी " नवीन सेवा " आहेत आणि म्हणून त्या, राज्य विधानमंडळाच्या निर्देशनास आणून देणे आवश्यक आहे. राज्य विधानमंडळाचे आगामी अधिवेशन १४ जुलै २००८ रोजी सुरू करण्याचे ठरले आहे. उपरोल्लिखित बाबींकरिता निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेले आदेश मात्र, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात पूरक मागण्या व विनियोजन विधेयक संमत करून त्याद्वारे, या " नवीन सेवांवरील " खर्च राज्य विधानमंडळाच्या निदर्शनास आणून देऊन व ते विधेयक विधानमंडळाचा अधिनियम म्हणून प्रसिद्ध झाल्यानंतरच देता येतील. तथापि, या बाबींवरील खर्च तातडीने करणे आवश्यक असल्यामुळे तो आकस्मिकता निधीमधून आगाऊ रकमा काढूनच भागवावा लागेल.

३. आकस्मिकता निधीची सध्याची मर्यादा फक्त रुपये १५० कोटीची आहे. निकडीच्या स्वरूपाच्या विविध बाबींवरील खर्च त्यामधून भागविल्यानंतर, सध्या या आकस्मिकता निधीमध्ये रुपये १६,२५,१५,३५० इतकी रक्कम शिल्लक आहे. वर उल्लेख केलेल्या बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ही शिल्लक अपुरी आहे. म्हणून, उपरोक्त खर्च भागविण्याकरिता, आकस्मिकता निधीच्या या सध्याच्या मर्यादेत रुपये २०० कोटींची तात्पुरती वाढ करून तो निधी रुपये ३५० कोटी इतका करणे इष्ट आहे असे वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियमात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २ जून २००८.

**एस. सी. जमीर,**
महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची
कार्ये पार पाडण्यासाठी नियुक्त.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्ही. के. अग्रवाल,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

बुधवार, जून ४, २००८/ज्येष्ठ १४, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2008 (Mah. Ord. IV of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

M. N. GILANI,
Principal Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

(Translation in English of the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2008 (Mah. Ord. IV of 2008), published under the authority of the Governor.)

**FINANCE DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th June 2008.

**MAHARASHTRA ORDINANCE No. IV OF 2008.**

*AN ORDINANCE*

*further to amend the Maharashtra Contingency Fund Act.*

WHEREAS both Houses of the State Legislature are not in session ;

AND WHEREAS I, Shri S. C. Jamir, discharging the functions of the Governor of Maharashtra, am satisfied that circumstances exist which render it necessary for me to take immediate action further to amend the Maharashtra Contingency Fund Act, for the purposes hereinafter appearing ;

Bom. XLVI of 1956.

NOW, THEREFORE, in exercise of the powers conferred by clause (1) of article 213 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to promulgate the following Ordinance, namely :—

Short title and commencement. **1.** (*1*) This Ordinance may be called the Maharashtra Contingency Fund (Amendment) Ordinance, 2008.

(*2*) It shall come into force at once.

Temporary amendment of section 2 of Bom. XLVI of 1956. **2.** During the period of operation of this Ordinance, the Maharashtra Contingency Fund Act shall have effect as if, in section 2 thereof, for the words " a sum of one hundred fifty crores of rupees " the words " a sum of three hundred fifty crore of rupees " had been substituted. Bom. XLVI of 1956.

# STATEMENT

The corpus of the Contingency Fund of the State established and maintained under the Maharashtra Contingency Fund Act (Bom. XLVI of 1956) is one hundred fifty crore of rupees.

2. The Government has decided to provide subsidy to onion growers in view of falling onion prices. Similarly, due to bumper sugarcane production, certain incentives are to be provided to sugar factories and subsidy is to be provided to farmers whose sugarcane is likely to remain uncrushed. The rice and pulses are required to be purchased from open market for distribution under the Public Distribution System in order to curb inflationary pressures. It is necessary to have certain amount in the Contingency Fund for these matters and other administrative expenses, if arise. Considering the heavy rain falls which Mumbai and Maharashtra State had witnessed in the past two years, the precautions will have to be taken in this year also. In the event of occurrence of the natural calamities, as a urgent relief, certain sum should be available in the Contingency Fund. These items of expenditure would constitute " New Services " and, therefore, they are required to be brought to the notice of the State Legislature. The ensuing session of the State Legislature is scheduled to commence on the 14th July 2008. Necessary orders for making available the funds for the abovementioned purposes can be issued only after the expenditure on these " New Services " is brought to the notice of the State Legislature, by way of Supplementary Demands and an Appropriation Bill, passed by both Houses of the State Legislature, is published as an Act of the State Legislature. However, as the expenditure on these items is required to be incurred immediately, it will have to be met by way of withdrawal of advances from the Contingency Fund.

3. The present corpus of the Contingency Fund is only Rs. 150 crore. Out of this, at present a balance of Rs. 16,25,15,350 is available in the Contingency Fund after meeting expenditure on various items of emergent nature. This balance is inadequate for meeting the expenditure on the abovementioned items. It is, therefore, considered expedient to temporarily increase the existing corpus by Rs. 200 crore to make the corpus of the Contingency Fund of Rs. 350 crore, so as to meet the expenditure as aforesaid.

4. As both Houses of the State Legislature are not in session, and the Governor of Maharashtra is satisfied that circumstances exist which render in necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Contingency Fund Act (Bom. XLVI of 1956) for the purposes aforesaid, this Ordinance is promulgated.

S. C. JAMIR,

Mumbai,
Dated the 2nd June 2008.

Discharging the functions
of the Governor of Maharashtra.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. K. AGGARWAL,

Additional Chief Secretary to Government.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई